आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
११ जुलै २०२६ - शनिवार

**ठळक बातम्या**

भारत आणि न्यूझीलंड दरम्यानचा व्यापार २०३० पर्यंत ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत नेण्याचा निर्धार संयुक्त निवेदनात व्यक्त

भारताच्या अध्यक्षतेखालील ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्यांची बैठक नागपुरात सुरू

राज्यात ४५ टक्के क्षेत्रावर खरीपाच्या पेरण्या पूर्ण

**आणि**

फिफा विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत आज नॉर्वेचा सामना इंग्लंडबरोबर/ अर्जेंटिनाची लढत स्वित्झर्लंडसोबत होणार

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि न्यूझीलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांनी दोन्ही देशांमधले द्विपक्षीय संबंध धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचा तसंच २०३० पर्यंत द्विपक्षीय व्यापार ३५ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवण्याचा निर्धार केला आहे, असं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव रुद्रेंद्र टंडन यांनी सांगितलं. प्रधानमंत्र्यांच्या न्यूझीलंड दौऱ्याविषयी माहिती देण्यासाठी आयोजित वार्ताहर परिषदेत त्यांनी ही माहिती दिली. भारत आणि न्यूझीलंड दरम्यान आज संरक्षण, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय, पर्यटन, क्रीडा आणि आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित पाच महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. दोन्ही नेत्यांमध्ये आज ऑकलंड इथं शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा झाल्यानंतर - या करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. दोन्ही देशांमध्ये येत्या चार वर्षांत होणाऱ्या संयुक्त उपक्रमांमध्ये 'भारत-न्यूझीलंड धोरणात्मक भागीदारी- २०३० पथदर्शी आराखडा' मार्गदर्शक चौकट म्हणून कार्य करेल, यावर या चर्चेत भर दिल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

भारत आपली पारंपरिक संरक्षण क्षमता आणि प्रगत तंत्रज्ञान अधिक सक्षम करुन एक मजबूत, आत्मनिर्भर आणि भविष्यासाठी सज्ज संरक्षण दलाची उभारणी करत आहे, असं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. विशाखापट्टनम इथं आज आय एन एस महेंद्रगिरी या स्वदेशी बनावटीच्या क्षेपणास्त्रवाहू युद्धनौकेचा जलावतरण समारंभ आणि नौदलात

समावेश राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत पार पडला. त्यावेळी ते बोलत होते. या युद्धनौकेविषयी राजनाथ सिंह म्हणाले…

**- - - होल्ड... बाईट - राजनाथ सिंह - - -**

भविष्यातल्या युद्धांमध्ये कदाचित कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल मात्र युद्ध हे राष्ट्राचा दृढनिर्धार, शूर सैनिक आणि सक्षम लष्करी सामर्थ्याच्या जोरावरच जिंकता येतं असं ते म्हणाले. केवळ दीड वर्षांच्या कालावधीत आपल्या नौदलाच्या ताफ्यात सहा युद्धनौकांचा समावेश झाला असून यातून भारताची जहाजबांधणी क्षमता, संरक्षण उद्योगक्षेत्राचा झपाट्यानं होणारा विस्तार आणि स्वदेशी उत्पादनातली विश्वासार्हता दिसून येते, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या परिवहन मंत्र्याच्या परिषदेला आज नागपूरच्या हॉटेल रेडिसन ब्लू इथं सुरूवात झाली. केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी या बैठकीचं अध्यक्षपद भूषवलं. पर्यायी जैव-इंधने आणि प्रदूषणमुक्त तंत्रज्ञानाचा अवलंब करून रस्ते, रेल्वे, हवाई आणि जलवाहतूक क्षेत्रात कार्बन उत्सर्जन शून्य करणारी वाहतूक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर प्रतिनिधींनी चर्चा केली, अशी माहिती गडकरी यांनी बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना दिली.

लवचिक आणि शाश्वत परिवहन व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी ब्रिक्स सदस्य देशांमध्ये अद्ययावत तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांची देवाणघेवाण केली जात आहे; तसेच, या सहकार्याला बळकटी देण्यासाठी या बैठकीत 'ब्रिक्स मंत्रीस्तरीय घोषणापत्र २०२६' देखील स्वीकारण्यात आलं आहे, असंही गडकरी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात मान्सूनने जोर धरल्याने खरीप हंगामातल्या पेरणीच्या कामांना वेग आला आहे. कृषी आयुक्तालयाच्या ७ जुलैच्या अहवालानुसार, राज्यातल्या ६५ लाख ११ हजार ८७२ हेक्टर, म्हणजेच ४५ टक्के क्षेत्रावर पेरणी पूर्ण झाली आहे. ऊसाची लागवड लक्षात घेतली तर एकूण ६५ लाख ८२ हजार ६२३ हेक्टर क्षेत्रावर पेरणी आणि लागवड झाली आहे.

अमरावती विभागात सर्वाधिक ५८ टक्के पेरणी झाली असून, त्यापाठोपाठ छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक विभागात प्रत्येकी ५० टक्के, लातूर विभागात ४४ टक्के, नागपूर विभागात ३९ टक्के, पुणे विभागात २२ टक्के, कोल्हापूर विभागात १५ टक्के, तर कोकण विभागात केवळ ४ टक्के पेरणी झाली आहे. उशिरा सुरू झालेल्या पावसामुळे कोकणात पेरणीला विलंब झाला असला, तरी अलीकडे झालेल्या पावसामुळे आता या कामांना गती मिळत आहे.

तेलबियांची ६० टक्के, कापसाची ४९ टक्के, कडधान्यांची ३७ टक्के आणि तृणधान्यांची ३० टक्के पेरणी झाली आहे. कापूस आणि सोयाबीन ही पिके सर्वाधिक क्षेत्रावर असून, भात, नाचणी, मका, तूर, मूग आणि उडीद पिकांच्या पेरणीलाही वेग आला आहे. पेरणी झालेली बहुतांश पिके उगवण ते रोपवाढीच्या अवस्थेत असून, काही भागांत भाताची पुनर्लागवड सुरू आहे.

गेल्या आठवड्यात राज्यभर झालेल्या पावसामुळे रखडलेल्या पेरण्यांना चालना मिळाली असून, पुढील काही दिवसांत पेरणीचे प्रमाण आणखी वाढण्याची अपेक्षा कृषी विभागाने व्यक्त केली आहे.

<><><><><>

पावसाने उघडीप दिल्यामुळे अकोला जिल्ह्यात शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. सुरुवातीला झालेल्या पावसाच्या भरवशावर बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली आहे. मात्र, गेल्या तीन दिवसांपासून पावसाने उघडीप दिल्याने पिकांच्या उगवणीसह वाढीवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

<><><><><>

उपजिल्हाधिकारी, तहसिलदार यांच्यासह महसूल विभागातल्या १५ अधिकाऱ्यांना निलंबित केल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल विधानपरिषदेत केली. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियमातल्या 'कलम १५५' चा गैरवापर करून मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर कामे केल्याचा आणि जमिनींचे फेरफार करण्याचा आरोप त्यांच्यावर आहे.निलंबित करून न थांबता या दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल केले जातील आणि काहींना सेवेतून बडतर्फ केले जाईल, असा इशाराही महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिला. पुणे विभागात चौकशीची एकूण ४२४ प्रकरणं संशयास्पद आढळली आहेत. यानंतर राज्यात गेल्या ५ वर्षात

कलम १५५ अंतर्गत झालेल्या सर्व आदेशांची ३ महिन्यात तपासणी करण्याचे आदेश महसूलमंत्र्यांनी दिले आहेत.

<><><><><>

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणानं स्वीगी इन्स्टामार्ट या कंपनीला नऊ नोटिसा बजावल्या. ग्राहकांना नासलेलं आणि मुदत संपलेले अन्नपदार्थ पुरवल्याच्या तक्रारीसह अनेक तक्रारी ग्राहकांनी केल्या होत्या. त्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याची माहिती प्राधिकरणानं समाजमाध्यमांद्वारे दिली. प्राधिकरणानं कंपनीकडून सविस्तर स्पष्टीकरण मागवलं आहे.

<><><><><>

फिफा विश्वचषक स्पर्धेत आज उपांत्य पूर्व फेरीत नॉर्वेचा सामना इंग्लंडशी होणार असून गतविजेत्या अर्जेंटिनाची लढत स्वित्झर्लंडसोबत होणार आहे. या सामन्यांमधून उपांत्य फेरीत प्रवेश करणाऱ्या उर्वरित दोन संघांची नावं स्पष्ट होतील. स्पेन आणि फ्रान्सनं याआधीच उपांत्य फेरीच्या अंतिम चार संघांमधलं आपलं स्थान निश्चित केलं आहे. स्पेननं बेल्जियमवर २-१ असा रोमांचक विजय मिळवून पुढची फेरी गाठली, तर फ्रान्सनं मोरोक्कोवर २-० असा सहज विजय मिळवत आगेकूच केली.

<><><><><>

भारताचा उंच उडीपटू आणि राष्ट्रीय विक्रमवीर सर्वेश कुशारे यानं मोनॅको इथल्या 'डायमंड लीग' ॲथलेटिक्स स्पर्धेत तिसरं स्थान पटकावलं आहे. या स्पर्धेत पहिल्या तीन क्रमांकामध्ये स्थान मिळवणारा तो चौथा भारतीय खेळाडू ठरला आहे.

अनेक दिग्गज खेळाडूंचा सहभाग असलेल्या या स्पर्धेत, २ मीटर २८ सेंटीमीटरची उंची पार करण्याचे तिन्ही प्रयत्न अयशस्वी ठरल्यामुळे त्याला तिसऱ्या स्थानावर समाधान मानावं लागलं.

<><><><><>

आषाढी वारीनिमित्त मुक्ताईनगर इथून पंढरपूरकडे निघालेल्या संत मुक्ताई यांच्या पालखीचं बीड शहरात अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झालं. बीडकरांनी आकर्षक रांगोळ्या काढून पालखीचं जल्लोषात स्वागत केलं. या पालखीचा मुक्काम आज आणि उद्या बीड शहरातील नामलगाव फाटा, हनुमान मंदिर आणि बालाजी

मंदिर परिसरात असणार आहे. पालखी तिसऱ्या दिवशी पहाटे आरतीनंतर पुढील मुक्कामासाठी पालीच्या दिशेने प्रस्थान करेल.

**//<><><><><>//**